16

I.O. प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** अहमदपूर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0160 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/05/2020 18:30 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 12/05/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/05/2020
**Time From (वेळेपासून):** 15:01 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:05 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/05/2020 **Time (वेळ):** 18:17 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/05/2020 18:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** लातुर जिल्हा मध्यवर्ती बँक ,अहमदुपर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गजानन नागनाथ नाळापुरे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उजना अहमदपुर,अहमदपुर ,अहमदपूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उजना अहमदपुर,अहमदपुर ,अहमदपूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष रंगनाथ गुंडरे | | | 1. गुणाले गल्ली अहमदपुर ,अहमदुपर , अहमदपूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादिदिनांक 12/05/2020मी गजानन नागनाथ नाळापुरे वय 23 वर्षे, व्यवसाय शेती रा. उजना ता. अहमदपुर जि. लातूर मो.नं. 9834189473समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी शेती व्यवसाय करतो. मी दिनांक 11/05/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथील पोलीस उपअधीक्षक बेद्रे साहेब यांनी फोन करुन माझी एका लोकसेवका विरुध्द तक्रार असल्याचे सांगुन मी त्यांना दिनांक 12/05/2020 रोजी लिंबोटी धरणावरील अहमदपुर ते नांदेड रोडवरील पुलावर येण्यास सांगितले.आज दिनांक 12/05/2020 रोजी मला पोलीस उपअधीक्षक बेद्रे साहेब यांनी सुमारे 12.45 वा. लिंबोटी धरणावरील अहमदपुर ते नांदेड रोडवरील पुलावर फोन करुन बोलावुन घेवुन रोडच्या बाजुस पोलीस निरीक्षक दराडे व सापळा पथकातील सदस्य व पंचाची ओळख करून देवुन मला पोलीस निरीक्षक दराडे यांनी नाव गांव विचारले असता मी त्यांना माझे नाव वर प्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.माझी माजे उजना गट नंबर 544 मध्ये आईच्या नावे व माझ्या नावाने शेती असुन सदर शेतीमध्ये ऊस लावणी केलेली आहे. आम्ही दोन महिण्यापुर्वी ऊस कर्ज मंजूर करीता आमच्या गावची विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी उजना मार्फत लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बंक शाखा अहमदपुर येथे रितसर माझा व माझे आईचा ऊस कर्ज मंजूरी करीता अर्ज केला होता. त्यानंतर आमचे ऊस कर्ज मंजूर झालेले आहे. मी काल दिनांक 11/05/2020 रोजी आमच्या गावचे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे गट सचिव गुंडरे साहेब यांना फोन करुन आमच्या कर्ज बाबत विचारणा केली असता त्यांनी माझे नावे 49,500/-रुपये व माझ्या आईच्या नावे 27,000/-रुपये मंजूर झाले असले बाबत सांगितले. मी गट सचिव गुंडरे यांना मंजूर झालेले ऊस कर्ज माझे व माझ्या आईचे बंक खात्यावर जमा करणे बाबत विनंती केली असता त्यांनी मला कर्जाची रक्कम बंक खात्यावर जमा करणेसाठी 2,000/-रुपये लाचेची मागणी केलेली आहे. माझा वर नमुद कामासाठी सचिव गुंडरे यांना लाच देण्याची इच्छा नाही. तसेच माझी सोसायटीची कसल्याही प्रकारची थकबाकी किंवा देणे नाही.तरी सबंधीत गटसचिव गुंडरे यांनी माझ्या वरील कामासाठी लाचेची मागणी करुन ती स्वतः अथवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांच्यावर कार्यवाही करावी अषा आषयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रार ही पोलीस निरीक्षक दराडे व पंचानी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.पोलीस निरीक्षक दराडे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने संबंधीत गट सचिव गुंडरे यांनी मला माझ्या वर नमुद कामासाठी लाचेची मागणी केली आहे. अगर कसे ? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन व ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक दराडे यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाही बाबत मला व पंच क्रमांक 1 बिराजदार तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. मी गटसचिव गुंडरे हे कोठे आहेत याबाबत माहिती घेतली असता ते अहमदपुर येथे बंकेत असल्याचे समजले.पोलीस निरीक्षक दराडे व सापळा पथकातील सदस्य हे षासकीय वाहनाने तसेच मी व एक पोलीस कर्मचारी हे माझ्याकडील मोटार

सायकलवर अहमदपुर येथे कोर्टा समोर आल्यावर तेथुन पोलीस निरीक्षक दराडे यांनी पोना सुरवसे यांना व्हईस रेकर्डर चालु करुन देण्या बाबत सांगितले. त्याप्रमाणे पोना सुरवसे यांनी 14.13 वा. डिजीटल व्हईस रेकर्डचे बटन चालु करुन ते माझ्या गळयात आडकावुन मी व पंच क्रमांक 1 बिराजदार असे माझाकडील मोटार सायकलवरुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बंक शाखा अहमदपुर येथे बकेच्या तिस-या मजल्यावरील बंक कार्यालयात जावुन सचिव गुंडरे यांची पंचासमक्ष भेट घेवुन माझ्या कामाच्या अनुशंगाने त्यांच्याषी चर्चा करुन मंजूर झालेल्या कर्जाबाबत विचारणा केली असता त्यावेळी सचिव गुंडरे यांनी रजिस्टरची पाहणी करुन तुझे ऊस कर्ज 49,500/-रुपये मंजूर झालय त्यातुन 2470/-रुपये षेअर्स कपात होवुन तुला 47,000/-रुपये मिळतील व आईला 25,650/-रुपये मिळतील असे सांगुन मला प्रत्येक 1,000/-रुपये प्रमाणे असे एकुण 2,000/-रुपये देवुन टाक त्यावर मी त्यांना काही तरी कमी करा असे विचारणा केली असता त्यांनी मला नाही सगळयांना तेवढच घेत आहे 2,000/-रुपये आणुन दे असे म्हणाले असता मी त्यांना मग कधी खात्यावर टाकणार असे विचारणा केली असता त्यांनी तु जर उदया दिला तर परवाला आज दिला तर उदया जमा करतो म्हणाले असता मी त्यांना नाही थोडया वेळात घेवुन येतो असे म्हणुन मी व पंच क्रमांक 1 बिराजदार असे षासकीय वाहनाजवळ परत आलो असता पोना सुरवसे यांनी माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद केले. पोलीस निरीक्षक दराडे यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 बिराजदार यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व संबंधीत सचिव गुंडरे यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 बिराजदार यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वानी पोलीस कर्मचारी सुरवसे यांचे मार्फतीने डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्यात व सचिव गुंडरे यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन गटसचिव गुंडरे यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 2,000/-रुपये लाचेची मागणी करुन घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द लाचेची सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.पोलीस निरीक्षक दराडे यांनी गट सचिव गुंडरे यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 04 चलनी नोटा समक्ष हजर केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक दराडे यांनी मला व पंचाना अन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक शासकीय वाहनामध्ये करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटेला पोक कच्छवे यांनी अन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये 2,000/-रुपये ठेवुन व लाचेची रक्कम दिल्यानंतर माझ्या गळयातील गमज्या डाव्या हाताने काढुन हातात घेणेबाबत सुनियोजीत ईशारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस निरीक्षक दराडे यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवही बाबत सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक दराडे व सापळा पथकातील सदस्य शासकीय वाहनाने व मी पंच क्रमांक 1 बिराजदार असे माझ्याकडील मोटार सायकलवरुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बंक अहमदपुर समोर येवुन तेथे शासकीय वाहन व मोटार सायकल उभे करुन तेथुन पोलीस निरीक्षक दराडे यांचे सुचनेनुसार पोलीस कर्मचारी सुरवसे यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर मशिन 15.01 वा. चालु करुन माझ्या गळयात आडकाविली असता मी पंच क्रमांक 1 बिराजदार असे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बंक शाखा अहमदपुरच्या तिस-या मजल्यावर वरील बंक कार्यालयात गेलो तसेच पोलीस निरीक्षक दराडे व सापळा पथकातील सदस्य तसेच पंच क्रमांक 2 वाघमारे हे आमच्या पाठीमागे आले. मी पंच क्रमांक 1 असे कार्यालयात जावुन गटसचिव गुंडरे यांची भेट घेवुन माझ्या कामाबाबत चर्चा करुन मंजूर.झालेले कर्ज खात्यावर जमा करणे बाबत विनंती केली असता त्यांनी जमा करतो म्हणुन हाताच्या इशा-याने लाचेची मागणी केली असता माझ्याकडील अन्थ्रासीन पावडरयुक्त 2,000/-रुपये लाचेची रक्कम काढुन गटसचिव गुंडरे यांच्या समोर धरली असता त्यांनी लाचेची रक्कम आपल्या उजव्या हाताने घेवुन त्यांच्या शर्टच्या समोरील छातीवरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यावर मी नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. पोलीस निरीक्षक दराडे व पंच क्रमांक 2 व सापळा पथकातील सदस्य असे सदर ठिकाणी आले. माझाकडील व्हाईस रेकर्ड पोलीस कर्मचारी सुरवसे यांनी बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक दराडे यांनी पंच क्रमांक 1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली ? याबाबत विचारणा केली. पंच क्रमांक 1 यांनी समोर खुर्चीवर बसलेल्या इसमाकडे हात करुन सांगितले की हे सचिव गुंडरे असुन त्यांनी लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम आपले उजव्या हाताने स्विकारुन शर्टच्या खिशामध्ये ठेवली आहे. त्यावेळी पोलीस निरीक्षक दराडे यांनी गटसचिव गुंडरे यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव संतोष रंगनाथ गुंडरे वय 39 वर्षे, पद गट सचिव नेमणुक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था उजना रा. गुणाले गल्ली अहमदपुर जि. लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक दराडे यांनी पंच क्रमांक 2 वाघमारे यांचे हस्ते गटसचिव गुंडरे यांच्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिशामधील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 बिराजदार यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटेचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर माझे व माझ्या आईचे ऊस कर्ज मंजूर बाबत तेथील रजिस्टरची पाहणी करुन पोलीस निरीक्षक दराडे व पंचांनी त्यावर स्वाक्ष-या केल्या. तेथील आवश्यक ती कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पोलीस निरीक्षक दराडे यांनी पुढील कायदेशिर कार्यवाही ही पोलीस स्टेशन अहमदपुर येथे करण्याचे ठरवुन गटसचिव गुंडरे यांना ताब्यात घेवुन पो.स्टे. अहमदपुर येथे येवुन पुर्ण केली. तरी यातील लोकसेवक संतोश रंगनाथ गुंडरे वय 39 वर्षे, पद गट सचिव नेमणुक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था उजना रा. गुणाले गल्ली अहमदपुर जि. लातूर यांनी माझ्या नावे 49,500/-रुपये व माझ्या आईच्या नावे 27,000/-रुपये ऊस कर्ज मंजूर झालेले माझ्या व आईच्या बंक खात्यावर जमा करणेसाठी 2,000/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम 15.05 वाजता पंचासमक्ष जिल्हा मध्यवर्ती सहकारी बंक शाखा अहमदपुर येथे गटसचिव गुंडरे यांनी स्वतः स्विकारली आहे म्हणुन माझी आरोपी विरुध्द कायदेशीर तक्रार आहे. मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रारी पोना सुरवसे यांनी लपटपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Sunil Bansilal Pujari(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन अहमदपूर
ता अहमदपूर जि.लातूर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Sunil Bansilal Pujari
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI